# Washim District Police

**Nature of Work** :- **Helping Women in distressed situation**

**Police Station** :- **Local Crime Branch, Washim**

**Date of Good Work done** :- **11/07/2022**

**Brief of the work done :-**

अनैतिक देहव्यापार चालविणाऱ्या कुंटनखान्यावर पोलिसांची धाड ; 04 पीडित महिलांची सुटका करत 02 जणांविरुद्ध गुन्हा दाखल.

पुण्यनगरी

## कुंटनखाना चालविणाऱ्या दोघांविरुध्द गुन्हा

वाशीम, दि. १० (प्रतिनिधी)

शहरातील शेलूबाजार मार्गावरील खुल्या जागेत कुंटनखाना चालविल्या जात असल्याची माहिती पोलिसांना मिळाली. त्यानुसार पोलिसांनी शनिवारी सायंकाळी छापा मारला असता याठिकाणाहून तीन ते चार जोडप्यांना सोडवून कुंटनखाना चालविणाऱ्या दोघांवर गुन्हा दाखल केला आहे. ही कारवाई स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने केली असून अनैतिक व्यापार करणारे रेखा इंगळे व अविनाश नामदेव सोनोने या दोघांवर गुन्हा दाखल केला आहे.

पोलीस सुत्रांकडून प्राप्त माहितीनुसार स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाला शेलुबाजार मार्गावरील जय गुरुदेव नगरच्या बाजूला सार्वजनिक



जागेत टिनशेड उभारुन अनैतिक (वेश्या व्यवसाय) केल्या जात असल्याची माहिती पोलिसांना मिळाली होती. त्यानुसार महिलांचे अनैतिक व्यापार (वेश्या व्यवसाय)करणाऱ्या महिलांना व ग्राहक तसेच घरमालक यांच्यावर स्त्रियांचा व मुलींचा अनैतिक व्यापार प्रतिबंधक अधिनियक १९५६ अन्वये कायदेशी करवाई करणे कामी बनावट ग्राहकाला बोलावून त्यांना मिळालेल्या माहीती बाबत सविस्तर माहीती देवुन रेड केली. यठिकाणी महिलांचे अनैतिक व्यापार (वेश्या व्यवसाय)चालविणारी एक महीला व महिलांचे अनैतिक व्यापार (वेश्या, व्यवसाय)करणाऱ्या चार पिडीत महीलांसह रोख १० हजार १२० व महिलांचे अनैतिक व्यापाराकरीता लागणारे साहीत्य पोलिसांनी जप्त केले. यावेळी महिलांचा अनैतिक व्यापार करुन कुंटनखाना चालविणारी महिला व तिच्यासोबत तालुक्यातील फाळेगाव थेट येथील अविनाश सोनोनेविरुध्द स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक सोमनाथ जाधव यांनी तक्रार देवून पिटा अंतर्गत गुन्हा दाखल केला आहे. सदर कारवाई जिल्हा पोलीस अधीक्षक बच्चन सिंग,अपर पोलीस अधीक्षक गोरख भामरे यांच्या मार्गदर्शनात पोलीस निरीक्षक सोमनाथ जाधव, प्रमोद इंगळे,किशोर चिंचोळकर, बाळु कंकाळ, सुनील पवार, राजेश राठोड, अमोल इंगोले, गजानन गोटे, संतोष शेनकुडे, शुभम चौधरी, अविनाश वाढे, शाम इंगळे, संदिप डाखोरे व सुषमा तोडकर, तहेमिना शेख व अंगुलीमुद्रा तज्ञ रोहीनी रिंडे, महेश आखरे, संदिप सरोदे या पथकाने केली.